# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:18.05.2025** **वार:रविवार**

---

**ठळक बातम्या**

- इस्त्रोद्वारे 101 व्या मोहिमेत भू-निरीक्षण उपग्रह अंतरिक्षात रवाना
- पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका मांडण्यासाठी सात बहुपक्षीय शिष्टमंडळांचा विविध देशांमध्ये दौरा
- भारतीय संरक्षण दलाच्या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ राज्यभरात तिरंगा यात्रा

आणि

- या आठवड्यात राज्यभरात कमी अधिक स्वरूपात सर्वत्र पाऊस

**इस्त्रो**

भारतानं आपल्या अंतराळ कार्यक्रमाच्या 101 व्या मोहिमेच्या प्रक्षेपणासह एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. इस्त्रोच्या PSLV-C61 रॉकेट द्वारा आज सकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटामधील सतीश धवन अंतराळ केंद्रातून EOS-09 हा पृथ्वी निरीक्षण उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला. याचा उपयोग विविध क्षेत्रांमध्ये प्रयोगांसाठी सातत्यपूर्ण आणि विश्वसनीय रिमोट सेन्सिंग डेटा प्रदान करण्यासाठी  होणार आहे. सर्वप्रकारच्या हवामान परिस्थितीत विविध पृथ्वीनिरीक्षण प्रयोगांसाठी चित्रं उपलब्ध करण्यास सक्षम असा SAR अर्थात सिंथेटिक ॲपर्चर रडार पेलोडही या मोहीमेसोबत असून इस्त्रोच्या कचरामुक्त मोहिमेशी सुसंगत असं हे अंतराळ यान असेल.

**प्रतिनिधी मंडळ**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका मांडण्यासाठी सरकार सात बहुपक्षीय शिष्टमंडळं वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवत आहे. या महिन्याच्या अखेरीस ही शिष्टमंडळं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्य देशांसह प्रमुख भागीदार देशांना भेट देणार आहेत. त्यामध्ये विविध राजकीय पक्षांचे खासदार, प्रमुख राजकीय व्यक्तिमत्त्वे आणि प्रतिष्ठित राजनैतिक अधिकारी यांचा समावेश असेल. या सात शिष्टमंडळांचं नेतृत्व भाजपचे रविशंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, काँग्रेसचे शशी थरूर, जेडीयूचे संजय कुमार झा, द्रमुकच्या कनिमोळी करुणानिधी, राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेनेचे श्रीकांत एकनाथ शिंदे करतील. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं की ही शिष्टमंडळं भारत दहशतवाद जराही सहन करत नाही हा संदेश घेऊन जातील, राजकारण आणि मतभेदांच्या पलीकडे राष्ट्रीय एकतेचं एक शक्तिशाली प्रतिबिंब म्हणून उभी राहतील.

तिरंगा यात्रा

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय संरक्षण दलाच्या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ भारतीय जनता पक्षाच्या वतीनं राज्यभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत असून; या यात्रांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ....

पालघर, हिंगोली,नंदुरबार, सांगली, कोल्हापूर या शहरात तिरंगा यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. कोल्हापुरात भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय सैनिक अशा पोषाखातील चिमुकल्यांनी सहभाग घेतला होता. माजी सैनिकांच्या उपस्थितीनंही एक वेगळाच उत्साह निर्माण झाला होता. गोंदिया शहरात सडक अरजूनी ते ग्राम सौदड पर्यन्त मोटर सायकल वरुन तिरंगा यात्रा काढण्यात आली. रत्नागिरी शहरातल्या मारुती मंदिर परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून ही यात्रा सुरू झाली.

भारतीय जनता पार्टी प्रदेश महिला मोर्चातर्फे राज्यभर सिंदूर यात्रांचं आयोजन केले जाणार असल्याची माहिती भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांनी दिली. मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

पुण्यात आज संध्याकाळी 4 वाजता छत्रपती संभाजी महाराज स्मारक ते संत ज्ञानेश्वर महाराज पादुका चौक अशी तिरंगा सन्मान यात्रा काढण्यात येणार आहे.

राज्यभरातून आकाशवाणीकडं भारत सरकार आणि भारतीय लष्करासाठी संदेश येत आहेत. धुळ्यातील एक शेतकरी गणेश चौधरी यांनी दहशतवादाला भारतीय लष्करानं दिलेल्या साहसी प्रत्युत्तराचं कौतुक केलं आहे. ऐकुया एका किसानानं जवानाला दिलेली ही मानवंदना:

**भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर ही जी मोहीम राबवली त्या मध्ये नेहमी प्रमाणे भारतीय लष्कराने जे उत्तुंग यश मिळवलं आहे त्याबाबत भारतीय सरकारने धडाडीचे निर्णय घेतले त्याचे एक शेतकरी म्हणून मी कौतुक करत आहे . भारतीय सैन्याने आपली कामगिरी चोख बजावून यशस्वी पणे परकीय आक्रमण उधळून लावलं अशा माझ्या भारतीय सैनिकांना मी एक किसान म्हणून अभिनंदन करत आहे, अशाच पद्धतीने सरकारने परकीय आक्रमण खपवून न घेता यावर कायमस्वरूपी बंदोबस्त केला पाहिजे .**

**ड्रोन बंदी**

ऑपरेशन सिंदूर नंतर दहशतवादी संघटनांकडून ड्रोनचा वापर वाढल्याचं निदर्शनास आलं आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रायगड जिल्ह्यात 3 जून पर्यन्त ड्रोन आणि तत्सम उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हा आदेश लागू केला आहे.

**गडकरी**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा वाढत असल्याचं म्हटलं आहे. ब्राझीलमधील साओ पावलो इथं भारतीय समुदायाशी संवाद साधताना, गडकरी यांनी विशेषतः जैवइंधन, हरित हायड्रोजन, आणि स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात भारत, गुंतवणुकीसाठी मोठी संधी असल्याचं सांगितलं. भारतीय समुदाय नवोपक्रम, कृषी-व्यवसाय, ऊर्जा आणि डिजिटल सहकार्याद्वारे भारत-ब्राझील संबंधांना पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका निभावत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केलं. भारताला संधींची भूमी असल्याचं सांगून गडकरी यांनी भारतीय नागरिकांना शाश्वत आणि समृद्ध भविष्य घडविण्याकरिता शोध, गुंतवणूक आणि भागीदारी करण्यासाठी आमंत्रण दिलं.

**कौशल्य वर्धन केंद्र**

रोजगाराच्या माध्यमातून युवकांना स्वावलंबी बनविण्यासोबतच उद्योगधंद्यांना प्रशिक्षित कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यातील विविध भागात कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल सांगितलं. येत्या काळात पुण्यातील लोहगाव आणि वडगावशेरी परिसरात विद्यार्थ्यांना अत्याधुनिक कौशल्ययुक्त शिक्षण मिळण्याकरीता कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येईल, असंही ते म्हणाले. टाटा ग्रुप, नगरविकास, पुणे महानगरपालिका यांच्याद्वारे संयुक्तपणे बाणेर इथं टाटा संचलित कौशल्यवर्धन केंद्राच्या भूमिपुजनप्रसंगी ते बोलत होते.

या प्रकल्पाअंतर्गत सर्व यंत्रसामुग्री, औद्योगिक हार्डवेअर, व्यावसायिक तंत्रज्ञान साधनं आणि यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर आणि इतर सर्व वस्तूंचं हस्तांतरण पुणे महानगरपालिकेस करण्यात येणार आहे. दरवर्षी सुमारे ७ हजार विद्यार्थ्यांना याद्वारे प्रशिक्षण देण्याचं उद्दिष्ट आहे. या प्रकल्पासाठी पालिकेकडून सुमारे १ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामध्ये सुमारे २२ हजार चौरस फूट क्षेत्रफळात इमारत उभारण्यात येणार आहे. या केंद्राचा नवउद्योजक, स्टार्टअप यांच्यासोबत लाखो युवकांना लाभ होणार आहे.

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान आज नागपूरला भेट देणार आहेत. गुलाबी बोंडअळीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्मार्ट सापळ्याचा ते आरंभ करणार आहेत. विदर्भात कापसावर होणारा बोंडअळीचा प्रादुर्भाव पाहता हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे. यासंदर्भात एक वृत्तांत...

**गुलाबी बोंडअळीसाठी स्मार्ट सापळा लावल्यानंतर मोबाईल फोनद्वारे दर तासाला शेतकऱ्याला माहिती मिळेल. सापळ्यात बसवलेला कॅमेरा फेरोमोनच्या गंधामुळे सापळ्यात चिकटलेल्या पतंगांचं नियमित छायाचित्र घेईल आणि लगेच शेतकऱ्याला आणि सर्व संबंधित यंत्रणांना पाठवेल. सापळ्यात अडकलेला पतंग ओळखण्यासाठी आणि मोजण्यासाठी प्रशिक्षित मशीन लर्निंग अल्गोरिथमचा वापर करून कीटकांच्या प्रतिमांचं विश्लेषण केलं जातं. पूर्वी शेतकरी क्वचितच सापळ्यात अडकलेल्या कीटकांची गणना करुन त्यांचं निरीक्षण करु शकत होते. कारण ही प्रक्रिया**

**वेळखाऊ आहे, रोज संपूर्ण शेतात फिरुन निरीक्षण करणं शक्य नाही आणि शेतकऱ्यांना इतर पिकांकडं देखील लक्ष द्यावं लागतं. बोंडअळीसाठी नव्या सापळ्यामुळं कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर कीटक व्यवस्थापनाचा सल्ला मिळेल, आणि नुकसान मर्यादेत ठेवता येईल. ही माहिती कृषी राज्य विभागाचे अधिकारी, तालुका अधिकारी आणि गाव पातळीवरील विस्तार अधिकाऱ्यांना देखील मिळेल, आणि ते शेतकऱ्यांना लगेच सल्ला देऊ शकतील. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, पावसामुळं काल यजमान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्ध कोलकाता नाइट रायडर्स हा सामना नाणेफेक होण्यापूर्वीच रद्द करण्यात आला. त्यामुळं गतविजेता कोलकाता नाइट रायडर्स संघ यंदाच्या आयपीएलमधून बाहेर पडला आहे. जयपूरमध्ये आज राजस्थान रॉयल्स विरुद्ध पंजाब किंग्ज आणि यजमान दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध गुजरात टायटन्स अशा लढती होतील.

**अवकाळी**

जळगाव जिल्ह्यात यंदा वादळी वाऱ्यांसह झालेल्या पावसामुळं जिल्ह्यातील 16 हजाराहून जास्त शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. सर्वाधिक फटका केळी, मका, ज्वारी, बाजरी आणि कांदा या पिकांना बसला आहे.

परभणी जिल्ह्यात काल विजा आणि वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस झाला. असंच वातावरण आणखी चार दिवस राहणार असल्याचं वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉक्टर कैलास डाखोरे यांनी सांगितलं आहे

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी पुढील 3 दिवस पिवळा बावटा जारी केला आहे. सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेनं खबरदारी घ्यावी, असं आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

हिंगोली जिल्ह्यात मागील आठवडाभरापासून पावसानं हजेरी लावली आहे. जिल्ह्यात 11 आणि 12 मे रोजी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला होता. त्यानंतर चार दिवस ढगाळ वातावरण कायम राहून 17 मे रोजी हिंगोली शहर आणि परिसर वगळता जिल्ह्यातील बहुतांश भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला.

सांगली जिल्ह्यातील मिरज, तासगाव,खानापूर आणि कवठेमहांकाळ या तालुक्यात वीजांसह आता पाऊस पडत आहे.

**हवामान**

या आठवड्यात राज्यात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, आणि विजांसह पाऊस तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**